आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दु १.३० वाजता

८ जुलै २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या रशिया आणि ऑस्ट्रिया दौऱ्यावर रवाना

- नीट युजी परीक्षा रद्द करुन नव्याने घेण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- महाराष्ट्रात राजधानी मुंबईचं जनजीवन पावसामुळे विस्कळीत/ कोकणातल्या इतर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस

- फ्रान्समधे सार्वत्रिक निवडणुकीच्या एक्झिट पोलमधे न्यू पॉप्युलर फ्रंट ही डावी आघाडी १७५ ते २०५ जागांवर विजयी होण्याचा अंदाज

**आणि**

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेत गतविजेता कार्लोस अल्काराज आणि अव्वल मानांकित जेनिक सिनर यांचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज तीन दिवसांच्या रशिया आणि ऑस्ट्रिया दौऱ्यावर रवाना झाले. आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, हा दौरा या दोन्ही देशांबरोबच्या भारताची मैत्री अधिक मजबूत करण्याची एक मोठी संधी आहे. त्याआधी विमानतळावरुन प्रसिद्ध केलेल्या निवेदनात त्यांनी सांगितलं की, भारत आणि रशियामध्ये गेल्या दहा वर्षात ऊर्जा, संरक्षण, व्यापार, गुंतवणूक, आरोग्य, शिक्षण, संस्कृती, पर्यटन आणि मनुष्यबळ क्षेत्रातली धोरणात्मक भागीदारी वाढली आहे. या दौऱ्यात प्रधानमंत्री भारत- रशिया २२ व्या वार्षिक शिखर परिषदेत

सहभागी होणार आहेत. रशियाचे अध्यक्ष आणि आपले मित्र व्लादिमीर पुतीन यांच्याबरोबर भविष्यात सहकार्या संबंधातील सर्व शक्यतांचा या दौऱ्यात आढावा घेतला जाणार असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. ऑस्ट्रिया हा भारताचा विश्वासू भागीदार असून दोन्ही देश लोकशाही मूल्यांचा आदर करणारे आहेत. या दौऱ्यात दोन्ही देशातील सहकार्य एका नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न करण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्रीपदाची शपथ सलग तिसऱ्यांदा घेतल्यानंतर मोदी यांचा हा पहिलाच परदेश दौरा आहे.

<><><><><>

नीट युजी परिक्षेसंबधात दाखल ३५ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर **नीट ची फेरपरीक्षा घ्यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह एकूण ३८ याचिकांवर सुनावणी होणार आहे.**

नीट युजी परिक्षेत झालेल्या गैरप्रकारामुळे ही परीक्षा रद्द करुन पुन्हा नव्याने घेण्यात यावी अशी मागणी करणाऱ्या याचिका अनेक विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी विविध उच्च न्यायालयात दाखल केल्या होत्या, त्याची एकत्रित सुनावणी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. मात्र ही परिक्षा पुन्हा नव्यानं घेतल्यास इतर लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांवर याचा प्रतिकूल परिणाम होईल, असं केंद्र सरकार आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेनं सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

**मुंबईसह** महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाने कालपासून हजेरी लावली आहे. मुंबई मध्ये काल रात्री १ वाजल्यापासून आज सकाळी सात वाजेपर्यंत ३०० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे मुंबईच्या सखल

भागात पाणी साचलं असून रस्ते आणि रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे. अनेक ठिकाणी बेस्ट बसेसचे मार्ग बदलण्यात आले आहेत. राज्यशासनानं शहरातल्या शाळांना आज सुट्टी जाहीर केली असून, मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि मुक्त अभ्यासक्रमाच्या आज होणाऱ्या सर्व परीक्षा रद्द केल्या असून या परीक्षा आता १३ जुलैला होणार आहेत.

**नाशिक- मुंबई** महामार्गावर पावसामुळे वाहतूक ठिकठिकाणी खोळंबली असून रेल्वे मार्गावरच्या लांब पल्ल्याच्या दोन गाड्या रद्द झाल्या आहेत. मुसळधार पावसामुळे **ठाणे, वसई, महाड, चिपळूण, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यात एनडीआरएफची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

**रायगड** जिल्ह्यात जोरदार पाऊस होत असून नद्यांच्या पाण्यात वाढ झाली आहे. रायगड किल्ला परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्यामुळे आज पासून रायगड किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे.

किल्ल्यावर अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे उतरवण्यात येत आहे.

**रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही संततधार पाऊस होत असून जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**मुंबई गोवा** महामार्गावरची वाहतूक कुडाळ नजीक पावशी इथं महामार्गावर पाणी आल्यामुळे गेले १२ तास ठप्प आहे. दोन्ही बाजूनं वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

मुंबई महानगरात जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. तसंच आज दुपारी दोनच्या सुमारास समुद्रात सुमारे साडेचार मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे.

हवामान खात्यानं **मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी** जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

मुंबई आणि उपनगरात साचलेलं पाणी उपसा करण्याचं काम सुरु असून वाहतूक पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व

आपत्कालीन यंत्रणांना हाय अलर्टचे आदेश दिले आहेत. मुंबईकरांनी आवश्यक असेल तरच बाहेर पडावं आणि यंत्रणांना सहकार्य कराव, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. पावसामुळं उद्भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावली आहे.

**<><><><><>**

मुंबई शहरात सध्या फक्त कुर्ला आणि शीव या भागात पाणी साठलेलं असून त्याचा निचरा करण्यासाठी अतिरिक्त पंप उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज विधान परिषदेत दिली. मुंबईतलं जनजीवन पावसामुळे विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर, सध्या परिस्थिती काय आहे आणि ती पूर्ववत करण्यासाठी काय पावलं सरकार उचलत आहे, याबाबतचं निवेदन सरकारने करावं, असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्यानंतर ते बोलत होते.

मुंबई, **रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे, असं त्यांनी सांगितलं. येत्या दोन तासांत परिस्थिती पूर्वपदावर येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. केसरकर यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट- केसरकर**

पावसामुळे राज्याच्या, विशेषतः मुंबईचं जनजीवन विस्कळीत होण्याला सरकार जबाबदार असल्याची टीका विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे…..

**होल्ड- बाईट- वडेट्टीवार**

**मुंबई** परिसरात मुसळधार पावसामुळे अनेक आमदार वेळेत पोहोचू न शकल्याने विधानसभेचं कामकाज दुपारी १ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प हा सामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, वंचित, महिला, उपेक्षितांचा अर्थसंकल्प आहे, खोट्या गोष्टी पसरवणाऱ्यांचं तोंड बंद करणारा हा अर्थसंकल्प आहे, असं प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी आज अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान केलं. शेतकरी, महिला, वारकरी, बेरोजगार या समाजघटकांसाठी या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या विविध योजनांचा पुनरुच्चार त्यांनी केला. सीमाभागातल्या मराठी शाळा, सहकार विभाग, शहरी बँका, गृहनिर्माण संस्था, तसंच रायगड पर्यटन आराखडा, कोकणासाठी निधी, एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्री स्तरावर बैठक इत्यादी मागण्याही दरेकर यांनी सरकारकडे केल्या. समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा हा अर्थसंकल्प असल्यामुळे याबद्दल सर्वत्र उत्साहाचं वातावरण असल्याचं दरेकर यांनी नमूद केलं.

विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार निरंजन डावखरे आणि जगन्नाथ अभ्यंकर यांनी आज विधान परिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. नंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झाले.

**<><><><><>**

फ्रान्सच्या सार्वत्रिक निवडणुकीचे एक्झिट पोल जाहीर झाले असून यानुसार न्यू पॉप्युलर फ्रंट ही डावी आघाडी १७५ ते २०५ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठी आघाडी म्हणून उदयाला येत आहे, तर इमॅन्युअल मॅक्राँ यांच्या नेतृत्वाखालची मध्यममार्गी एन्सेम्बल अलायन्स दीडशे ते १७५ जागांवर विजयी होण्याची शक्यता आहे. फ्रान्समधली अति उजवी आघाडी - नॅशनल रॅली तिसऱ्या स्थानावर फेकली गेली आहे. ही आघाडी ११५ ते दीडशे जागा जिंकेल. कोणत्याही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं नसून त्रिशंकू अवस्था निर्माण झाली आहे.

मतदानाच्या या दुसऱ्या टप्प्यात ५७७ पैकी ५०१ जागांवर निवडणूक झाली. पहिल्या टप्प्यात ७६ जागांवर निवडणूक झाली होती.

दरम्यान, मॅक्राँ यांच्या नेतृत्वाखालच्या आघाडीचा पराभव झाल्यामुळे प्रधानमंत्री गॅब्रीयल अटल यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत गतविजेता कार्लोस अल्काराज आणि अव्वल मानांकित जेनिक सिनर यांनी काल उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

अल्काराझने  फ्रान्सच्या उगो हम्बर्ट याचा ६-३, ६-४, १-६, ७-५ असा पराभव केला. तर सिनरनं अमेरिकन खेळाडू बेन शेल्टन याला ६-२,६-४,७-६(९) असं नमवलं. सात वेळा विजेतेपद पटकावणारा नोवाक जोकोविच याचा सामना डेनिश खेळाडू वोल्गर रुन याच्याशी आज रात्री होणार आहे.

**<><><><><>**

येत्या ४-५ दिवसांत देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर तसंच ईशान्य भारताच्या अनेक भागांमध्ये आणि उत्तर प्रदेशात; मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. उत्तर प्रदेशात आज, आणि १०-११ तारखेलाही तुरळक ठिकाणी, अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. आज उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ओडिशामध्ये उद्या तर; आज आणि उद्या बिहारमध्ये; मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**